# संशोधन आराखडा निश्चिती

**डॉ. एच.डी. चित्ते**
सहा. प्राध्यापक एम.एड.
मविप्र समाजाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय
नाशिक

संशोधन समस्या निश्चिती झाल्यानंतर संशोधकांनी संबंधित साहित्य व संशोधन आढावा घेणे गरजेचे आहे. कारण संशोधकाने निवडलेला संशोधन विषय Repeat तर होत नाही ना? या दृष्टीकोनातून आढावा अत्यंत गरजेचा आहे. एकदा खात्री झाल्यानंतर उद्‌दिष्टे, मांडणी, संशोधन कार्यपद्‌धती निश्चिती करण्याकरिता आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

संशोधन कार्य व्यवस्थित व पद्‌धतशीर होण्यासाठी संशोधन आराखडा निश्चित करणे गरजेचे आहे. संशोधन आराखड्याच्या पायऱ्या साधारणपणे पुढीलप्रमाणे असतात.

१) प्रस्तावना

२) संशोधनाची गरज

३) संशोधनाचे महत्त्व

४) समस्या विधान

५) समस्येचे स्पष्टीकरण

६) संकल्पनात्मक व्याख्या

७) कार्यात्मक व्याख्या

८) संशोधन प्रश्न

९) संशोधनाची उद्‌दिष्टे

१०) गृहितके

११) परिकल्पना

१२) चल

१३) व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा

१४) संबधित साहित्य व संशोधनाचा आढावा

१५) संशोधनाची कार्यपद्धती

अ) संशोधन पद्धती

ब) जनसंख्या व नमुना निवड

क) संशोधन साधने

ड) संख्याशास्त्रीय विश्लेषण

१६) संभाव्य ज्ञानात्मक योगदान

१७) प्रकरणीकरण

१८) खर्चाचे अंदाजपत्रक

१९) संदर्भ सूची

विस्तृतपणे वरील संशोधन आराखड्याच्या पायऱ्यासंदर्भात पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल.

**१) प्रस्तावना-**

या मुद्द्यामध्ये संशोधन विषयासंदर्भातली पार्श्वभूमी मांडता येईल. संशोधन विषय कसा सूचला? या संदर्भातील मांडणी करता येईल.

**२) संशोधनाची गरज-**

अशा कोणत्या समस्या निर्माण झाल्या की, ज्यामुळे संशोधनाची गरज वाटली. ज्या समस्या आहेत. त्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे, या संदर्भातील विवेचन या मुद्द्यासंदर्भात अपेक्षित आहे.

**३) संशोधनाचे महत्त्व-**

सदर संशोधन कार्य केल्यानंतर समस्यांचे निराकरण होईल. Problem Solving होईल. संशोधनामुळे समस्या कशा पद्धतीने दूर होतील. हे विवेचन अपेक्षित आहे.

**४) समस्या विधान-**

या मुद्द्यापर्यंत सविस्तर समस्या विधानाची मांडणी अपेक्षित आहे.

**५) समस्येचे स्पष्टीकरण-**

समस्येसंदर्भातील थोडक्यात स्पष्टीकरण द्यावे.

**६) संकल्पनात्मक व्याख्या-**

संशोधन शीर्षकात आलेल्या संकल्पनांच्या व्याख्या येथे अपेक्षित आहे. त्या व्याख्यांचे स्त्रोत म्हणजेच संदर्भ देणे गरजेचे आहे.

उदा. : अभि + आस = बसणे, या संस्कृत शब्दाचा अर्थ भोवती बसून शिकणे. अभ्यासाचा दुसरा अर्थ सराव असाही होतो.

**सोहोनी, शं.कृ., शैक्षणिक टीपाकोश (१९९३)**

या प्रकारे संकल्पनात्मक व्याख्यांची मांडणी करावी.

**७) कार्यात्मक व्याख्या-**

कार्यात्मक व्याख्येला इंग्रजीत Functional किंवा Operational Definition असे म्हणतात. संशोधकाने संशोधन हे Function किंवा

Operation करण्यासाठी संशोधन शीर्षकातील संकल्पना कोणत्या अर्थाने वापरल्या आहेत यालाच कार्यात्मक व्याख्या असे म्हणतात म्हणून संशोधकाने समस्या शीर्षकातील संकल्पना स्पष्ट करणे गरजेचे आहे.

**८) संशोधन प्रश्न-**

संशोधकाला समस्या निर्माण होण्यासंदर्भात जे जे संशोधन प्रश्न निर्माण झाले, त्याची मांडणी येथे अपेक्षित आहे. थोडक्यात, संशोधनाअंती ज्या ज्या प्रश्नांची उत्तरे शोधावयाची आहे, त्याची मांडणी येथे अपेक्षित आहे.

**९) संशोधनाची उद्‌दिष्टे-**

संशोधनाची जी जी उद्‌दिष्टे आहेत ते ते नेमके व अचूक या मुद्‌द्याअंतर्गत मांडावे.

**१०) गृहीतके-**

संशोधन कार्य करण्यासंदर्भात संशोधकाने जे जे गृहीत धरले आहे. त्याची मांडणी येथे अपेक्षित आहे. शक्यतो गृहीतकांना संदर्भ अपेक्षित आहेत.

**११) परिकल्पना-**

या मुद्‌द्याअंतर्गत समस्येचे संभाव्य उत्तर अपेक्षित आहे. दिशांकीत किंवा संशोधन परिकल्पना आणि शून्य परिकल्पना मांडाव्यात. जर संशोधक प्रायोगिक पद्‌धती वापरणार असतील तर परिकल्पनांची मांडणी अनिवार्य आहे.

**१२) चल-**

साधारणपणे स्वाश्रयी चल व आश्रयी चल आहे. कोणत्या चलांचा, कोणत्या चलांवर परिणाम होतो हे मांडणे गरजेचे आहे.

**१३) व्याप्ती, मर्यादा, परिमर्यादा-**

संशोधन कार्य ज्या ज्या घटकांशी संबंधित आहे, ते ते व्याप्तीमध्ये मांडावे. संशोधनाची मर्यादा व परिमर्यादा स्पष्ट करावी. व्याप्तीमध्ये च्याशी संबंधित आहे, तर मर्यादित केवळ या शब्दांचा वापर करावा.

**१४) संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा-**

या मुद्द्यांच्या क्रमासंदर्भात लवचिकता आहे. मात्र, हा मसुदा आराखड्यात अनिवार्य आहे.

साहित्याचा व संशोधनाचा आढावा घ्यावा. संशोधनाचा आढावा सालांच्या चढत्या किंवा उतरत्या क्रमानूसार मांडावा.

**१५) संशोधनाची कार्यपद्धती-**

**१) संशोधन पद्धती-**

संशोधक जी संशोधन पद्धती वापरणार आहे. त्या पद्धतीची सविस्तर माहिती अपेक्षित आहे.

**२) जनसंख्या व नमुना निवड-**

संशोधकांची संशोधनासंदर्भात जी जनसंख्या आहे. ती नमूद करावी. तसेच जनसंख्येतून नमूना कोणत्या पद्धतीने निवडणार आहे, ते मांडावे. मग ती संभाव्येतर आधारित किंवा असंभाव्यतेवर आधारित नमुना निवड पद्धती असेल.

**३) संशोधन साधने-**

संशोधनासाठीची आवश्यक माहिती नमुन्यांकडून कशाच्या आधारे गोळा केली जाणार आहे. ते ते संशोधनाची साधने मांडावीत.

**४) संख्याशास्त्रीय विश्लेषण-**

संग्रहीत केलेली माहिती विश्लेषण करताना, जे जे संशोधन साधन वापरणार आहे ते ते मांडावे.

**१६) संभाव्य ज्ञानात्मक योगदान-**

संशोधनातून संभाव्य जी ज्ञाननिर्मिती होणार आहे, ती या मुद्यांतर्गत अपेक्षित आहे.

**१७) प्रकरणीकरण-**

संशोधनासंदर्भातील प्रकरण रचना संशोधन आराखड्यात मांडावी.

**१८) खर्चाचे अंदाजपत्रक-**

संशोधनाकरिता येणारा संभाव्य खर्च येथे मांडणे अपेक्षित आहे.

**१९) संदर्भ सूची-**

संशोधनासाठीचे संदर्भ APA पद्धतीने मांडावेत.

अशा पद्धतीने संशोधन आराखड्याच्या या पायऱ्या विस्तृतपणे मांडाव्यात, म्हणजेच नक्कीच एक दर्जेदार संशोधन आराखडा तयार होईल.

**संदर्भ :**

पंडित बन्सी बिहारी, **शिक्षणातील संशोधन** (संख्यात्मक व गुणात्मक), पुणे : नित्यनूतन प्रकाशन.

Ansari Shahid, **Educational Research Methodology,** Nashik : 293, Insight Publications

Khan, J.A. 2011 : **Research Methodology,** Delhi : A.P.H. Publishing Corporation.

Pandya Shefali, 2012 : **Research Methodology,** Delhi : A.P.H. Publications.